# उपोद्घात

राज्य वित्त लेखापरीक्षा अहवाल राजघटनेच्या अनुच्छेद 151 अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालातील **प्रकरण I** मध्ये राज्य वित्त लेखापरीक्षा अहवालाचा आधार आणि दृष्टिकोण, अहवालाची रचना, शासकीय लेख्यांची रचना, अर्थसंकल्पीय प्रक्रिया, प्रमुख राजकोषीय मापदंडाचा कल जसे महसूल आधिक्य/तूट, राजकोषीय आधिक्य/तूट इत्यादींचा समावेश आहे.

या अहवालातील **प्रकरण II आणि III** मध्ये 31 मार्च 2022 रोजी संपलेल्या वर्षाच्या राज्य शासनाच्या वित्त लेखे आणि विनियोजन लेख्यांच्या परीक्षणाच्या बाबीतून उद्भवलेली लेखापरीक्षा निरीक्षणे आहेत. जिथे आवश्यक आहे तिथे महाराष्ट्र शासनाकडून माहिती घेण्यात आली आहे.

'लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय अहवाल पद्धती' वरील **प्रकरण IV,** 2021-22 दरम्यान विविध वित्तीय नियम, पद्धती आणि दिशानिर्देशांसोबत राज्य शासनाच्या अनुपालनाचा आढावा आणि स्थिती प्रदान करते.

**प्रकरण** V मध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या वित्तीय कामगिरीचा आढावा आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या द्वारे वैधानिक लेखापरीक्षकांच्या कामगिरीवर देखरेख आणि सार्वजनिक उपक्रमांच्या लेख्यांच्या पूरक लेखापरीक्षणावर देखरेखीच्या भूमिकेचे परिणाम समाविष्ट आहेत. नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 (संशोधीत केल्यानुसार) च्या कलम 19 अ च्या प्रावधानानुसार शासकीय कंपन्यांचे किंवा महामंडळांचे लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळासमक्ष प्रस्तुत करण्यासाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक शासनाला सादर करतात.

नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या अहवालात विविध शासकीय विभागांचे कार्यनिष्पादन लेखापरीक्षण विविध शासकीय विभागांचे कार्यनिष्पादन लेखापरीक्षण आणि अनुपालन लेखापरीक्षणाचे निष्कर्ष, वैधानिक महामंडळे, मंडळे आणि शासकीय कंपन्यांच्या लेखापरीक्षणातून उद्भवलेली निरीक्षणे आणि महसूल प्राप्तीवरील निरीक्षणे स्वतंत्रपणे दर्शविली आहेत.

नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी जारी केलेल्या लेखापरीक्षा मानकांच्या अनुरूप लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीपः मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादितः शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.**